# व्यक्तीपरिचय

## साहित्यसेवक कै. विठ्ठल सीताराम गुर्जर

''कशी या त्यजुपदाला'', 'सत्यवदे वचनाला नाथा', प्रभु अजि गमला मनी तोषिला, 'दया छाया घे', 'झणि दे कर या', ''ललना मना, राजस बाळा'' या अविट नाट्य पदांचे जनक म्हणून ज्यांनी लोकप्रियता मिळवली ते नाट्य पदकार कै. विठ्ठल सीताराम गुर्जर झाले असे की, ''एकच प्याला'' नाटकाचे गद्य लेखन कै. राम गणेश गडकरी यांनी केले आणि हे नाटक कै. बालगंधर्व यांनी बसवायला घेतले या दरम्यान गडकरी आजारी पडले आणि नाटकांतील पदे कोणी लिहायची हा प्रश्न पडला. ग़डकरी म्हणाले विठ्ठल सीताराम गुर्जर हे सध्या नाट्यपदे लिहितील व ते (गडकरी) बरे झाले म्हणजे नाट्यगीते लिहितील परंतु गडकरी आजारातून बरे झाले नाहीत आणि त्यांचे दुःखद निधन झाले. त्यामुळे ''एकच प्याला'' या नाटकांत कै. विठ्ठल उर्फ अण्णासाहेब सीताराम गुर्जर यांचीच पदे राहिली व ती अजरामर झाली. या एकूण २५ नाट्यपदांना चाली सुंदराबाई जाधव यांनी दिल्या होत्या.

कै. अण्णासाहेब गुर्जरांनी खूप साहित्य सेवा केली त्यांनी एकूण ७०० कथा, गोष्टी, त्याचप्रमाणे देवदास, नागमोड, पौर्णिमेचा चंद्र प्रेमसंयोग, गौप्य गोपान, भ्रमनिरास, संगीत प्रणय मुद्रा, संगीत राजलक्ष्मी, जीवनसंध्या, हतभागिनी, प्रितीची रीत, वाचनमाला अशा अनेक कादंबऱ्यांचे लेखन झाले. त्यांनी लिहिलेले संगीत नंदकुमार हे नाटक गाजले. नटसम्राट बालगंधर्व हे नाटक करीत असत त्यामधील गीते खूप लोकप्रिय झाली.

असे हे अण्णासाहेब उर्फ विठ्ठल सीताराम गुर्जर यांचा जन्म १८८५ मध्ये राजापूर तालुक्यात झाला; तर कर्मभूमी कशेळी. कशेळीला बरीच गुर्जर घराणी आहेत. कै. अण्णासाहेबांचे वडील सीतारामपंत बाबाजी गुर्जर हेही साहित्यिक होते. त्यांचाच वारसा, अण्णासाहेबांना मिळाला. कै. अण्णासाहेबांनी कशेळी गावासाठी खूप कार्य केले. त्यांनी श्री. लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळाचे स्कूल कमिटीचे चेअरमन म्हणून काम पाहिले आणि त्याचबरोबर साहित्य लेखनही केले. त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य म्हणजे कथेचे



औत्सुक्य वाढविण्यासाठी रहस्याचा वापर करून शेवटी आनंद पर्यायवासी कलाटणी देऊन वाचकांना सुखद धक्का देणे हे होय.

कै. अण्णासाहेब कशेळीत रहात होते. पण त्यांचे स्वतःचे घर ही उभे राहू शकले नाही. एवढे धबधब्यासारखे साहित्य असूनही त्या साहित्यामधील काहीच कथा शिल्लक आहेत. त्यांच्या या साहित्य, शिक्षण क्षेत्रातील कार्यामुळे कशेळी ग्रामस्थांना त्यांच्याबद्दल नितांत आदर होता.

कै. अण्णासाहेबांचा स्वभाव थोडासा तापट आणि अलिप्त राहणी होती. ते पूर्णपणे निर्व्यसनी होते आणि साधेपणाने रहात. ते मितभाषी व प्रसिद्धी पराङ्मुख होते. ते भावनाप्रधान असले तरी ते नास्तिक होते असं वाटते कारण कशेळी मधील देव कनका दित्याचे मंदिर असूनही आणि ते तेथून जात असतांना त्यांनी कधी देवाला साधा नमस्कारही केल्याचे दिसले नाही. कै. अण्णासाहेब भावनाप्रधान असल्याचे त्यांच्या कृतीवरून दिसते. त्यांची ३वर्षाची नात मृत्यु पावली त्या जागी स्मशानात ते दररोज जात असत व तेथे ते पेपरमिंटच्या गोळ्या ठेवत. नातीच्या स्मृती दिवशी ते व त्यांच्या पत्नी उपवास करत. स्वभाव अलिप्त असल्यामुळे काही निवडक मित्रांशिवाय म्हणजे मेव्हणे रघुनाथराव कळके, भास्करराव सावरे, जगन्नाथराव सावरे यांचेकडे उठबस असे तरीपण जर कशेळीत आपल्या ज्ञातीमध्ये जर कोणाचे निधन झाले तर ते अंत्य यात्रेमध्ये हमखास जात असत.

कशेळी ग्रामस्थांना कै. अण्णासाहेबांबद्दल वाटत असलेल्या आदराचे स्मारकात परिवर्तन व्हावे असे वाटत होते आणि म्हणून १९८५ च्या दरम्यान लक्ष्मीनारायण शिक्षण प्रसारक मंडळीने वार्षिक साधारण सभेमध्ये एक ठराव करून कै. अण्णासाहेबांचे स्मारक व्हावे म्हणून कै. विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिर स्थापन करण्याचा ठराव करून त्यांच्या २५ व्या स्मृतिदिनी कै. विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिराची स्थापना झाली.

प्रत्येक माणसाच्या स्वभावांत कांही मर्मस्थाने असतात त्यास कै. अण्णासाहेब अपवाद नाहीत. त्यांना सभा कंप आणि परीक्षा कंप होता. त्यामुळे त्यांनी कधीच सभा संमेलनात सहभाग घेतला नाही. अगदी त्यांची साहित्य संमेलनाध्यक्षपदी नेमणूक झाली त्या सभेत व संमेलनाध्यक्ष म्हणून तिथेही गेलेले नाहीत. ते बी.ए. पर्यंत शिकले परंतु परीक्षा कंपामुळे त्यांनी पुढील शिक्षण घेतले नाही असे जरी असले तरी आज अभिमानाने नमूद करावेसे वाटते की, त्यांनी लिहिलेली पुस्तके, कादंबऱ्या बी.ए.च्या अभ्यासक्रमासाठी लावली होती.

अशा या विलक्षण प्रतिभा असलेल्या परंतु प्रसिद्धी पासून दूर असलेल्या साहित्यिकाची जीवन यात्रा १९ सप्टेंबर १९६२ रोजी समाप्त झाली.

**– गणेश गुर्जर**

संकलन – स्मरणिका विठ्ठल सीताराम गुर्जर विद्यामंदिर स्मरणिका व आर्य संगीत प्रसारक मंडळातील लेखनामधून

**बुडत्याला (बिन) पाण्याचा आधार**

''बुडणाऱ्या माणसाला वाचविण्याचे ताबडतोब दोन उपाय सांग!'' गुरुजी म्हणाले.

''पहिलं म्हणजे त्याला पाण्याबाहेर काढायचं'', बंडू म्हणाला, ''अन् दुसरं त्याच्यातलं पाणी बाहेर काढायचं.''



**– संकलन –**

**केशव फडणीस**